दैनिक

wwww.lokaarambh.com

# लोक आरंभ

संपादक: राहुल मारोतीराव वाईकर

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

बीड | वर्ष - ०४ थे | अंक ६५ | शनिवार २१ फेब्रुवारी २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रू

Beed | year - o4 th | Issue65 | Saturday21February2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# तोपर्यंत कुणाच्या बापाला घाबरायचं नसतं, अमोल कोल्हे यांनी दिले आव्हान

| प्रतिनिधी
अभिनेता आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे यांच्या पुणे विद्यापीठातील भाषणाला काही संघटनानी विरोध केला होता. त्या पार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठात प्रचंड बंदोबस्त नेण्यात आला आहे.आता थोड्यावेळापूर्वीच अमोल कोल्हे यांचे पुणे विद्यापीठात आगमन झाले असून त्यांनी यावेळी मीडियाशी बोलताना जोपर्यंत तुम्ही प्रामाणिकपणे छत्रपती मांडताय तोपर्यंत कुणाच्या बापाला घाबरायचं नसतं असे आव्हान देत व्याखान घेणारच अशी भूमिका मांडली आहे. अथवा त्याकडे काहीतरी इंगित करत आहेत. या भूमिकेने त्यांच्या जीवाला धोका होण्याची भीती पवार कुटुंबियांनी व्यक्त केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार आणि अभिनेते डॉ. अमोल कोल्हे जीवनावर व्याख्यान ठेवण्यात आले आहे. या व्याख्यानाला एका मराठी मालिकात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली अभ्यासही केला आहे. त्यामुळे त्यांना या व्याख्यानाला बोलवण्यात विद्यापीठ परिसरात प्रचंड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. आहे. सायंकाळी अमोल कोल्हे यांचे व्याख्यान असून त्यासाठी ते संवाद साधला. राजकारणाचे जोडे बाहेर ठेवतो मला कळले की आहे. मला त्यांना विनंती करायची आहे.ज्यांनी कोणी विरोध केला आहे. मी सर्व प्रश्नांची उत्तरे द्यायला तयार आहे. ज्या छत्रपतींच्या व्याख्यानाला झालाय, याच पुण्यात त्यांचा पहिला अश्वारुढ पुतळा उभारायलाही स्मरणात राहिली नव्हती ही वस्तू स्थिती आहे. कुठलीही व्याख्यान महाराजांची भूमिका साकारतो तेव्हा राजकारणाचे जोडे बाहेर ठेवतो



यांचे पुणे विद्यापीठात छत्रपती शिवाजी महराज यांच्या संघटनेने विरोध केला आहे. अभिनेते अमोल कोल्हे यांनी आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राचा आले आहे. मात्र एका संघटनेने विरोध केल्याने पुणे तसेच विद्यार्थ्यांनाही आयकार्ड पाहून प्रवेश दिला जात विद्यापीठात दाखल झाले त्यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी काही विद्यार्थ्यांनी माझ्या व्याख्यानाला विरोध केला त्यांनी व्याख्यानाला यावे ते ऐकावे मला प्रश्न विचारावेत विरोध होतोय.त्या छत्रपतींच्या राज्याभिषेकालाही विरोध विरोध झाला होता.छत्रपतींची समाधी १८० वर्षे लोकांच्या देणे हा वैचारिक भाग आहे. ती केव्हाही छत्रपती शिवाजी असेही अमोल कोल्हे यांनी सांगितले.

## मत्स्योदरी विधी महाविद्यालयात प्रा.निलेश कुहिरे यांचे शिवजयंती निमित्त दमदार व्याख्यान




दि.१९ फेब्रुवारी रोजी मत्स्योदरी विधी महाविद्यालय,जालना येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रमुख वक्ते शिवव्याख्याते प्रा.निलेश कुहिरे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा कुहिरे मार्गदर्शनपर बोलताना म्हणाले की,छत्रपती शिवाजी महाराजानी स्वराज्य स्थापनेचा जो ध्यास घेतला तो केवळ राजकीय नव्हता तर सामाजिक आणि सांस्कृतिक पुनरूस्थानासाठी होता. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक देत न्यायप्रविष्ट आणि लोकभीमुक राज्यकारभार केला.
युवकानी शिवरायाच्या विचाराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा असे आव्हानही त्यांनी केले शिवजयंती हा केवळ उत्सव नसून स्वराज्य, स्वाभिमान आणि कर्तव्यनिष्ठ याची जाणीव करून देणारा दिवस असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. शेख टी. वाय.,कार्यक्रम नियोजन समिती प्रा.गोरे एस.जे.,प्रा. पवार आर.पी.प्रा. डॉ.देशमुख एस.व्हि.,कार्यालयीन कर्मचारी सह शिवप्रेमी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन प्रा.हंगरगे एस.डी.यांनी केले.

## परीक्षेशी संबंधित नसलेली व्यक्ती केंद्र परिसरात आढळल्यास कठोर कारवाई- जिल्हाधिकारी राहूल कर्डिले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : इयत्ता 10 वीची परीक्षा जिल्ह्यातील 178 केंद्रांवर सुरू झाली. मराठी विषयाच्या पेपरसाठी नोंदणीकृत 44 हजार 991 परीक्षार्थ्यांपैकी 43 हजार 949 परीक्षार्थी उपस्थित होते. उपस्थितीची टक्केवारी 97.68 इतकी नोंदविण्यात आली.

प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हिडिओ कॅमेऱ्यांच्या सहाय्याने संपूर्ण वेळ परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व 178 केंद्रांवर आजची इयत्ता 10 वीची परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त वातावरणात पार पडली.

परंतु जिल्ह्यातील काही केंद्रांवर परीक्षा कालावधीत परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्ती परिसरात दिसून आल्या आहेत. ही बाब भारतीय न्याय संहिता कलम 163 चे उल्लंघन असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे उद्यापासून इयत्ता 12 वी तसेच पुढील सर्व इयत्ता 10 वी व 12 वीच्या पेपरदरम्यान परीक्षा केंद्र परिसरात परीक्षेशी संबंध नसलेली व्यक्ती आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असा सज्जड



इशारा जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी दिला आहे.

सहायक जिल्हाधिकारी झेनित चंद्र दोंतुला यांनी इयत्ता 12 वीच्या परीक्षेदरम्यान दहेली तांडा केंद्रास भेट दिली असता त्यांना काही अनधिकृत व ओळखपत्र नसलेल्या व्यक्ती परीक्षा केंद्र परिसरात फिरताना आढळून आल्या. ही बाब निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व परीक्षा केंद्रांवर कठोर अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत. संबंधित व्यक्ती त्या शाळेचे कर्मचारी किंवा संस्थेचे प्रतिनिधी असले तरी परीक्षेशी थेट संबंध नसल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

दि. 21 फेब्रुवारी 2026 रोजी इयत्ता 12 वीचा महत्त्वाचा गणित विषयाचा पेपर असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समितीचे अध्यक्ष राहूल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना विविध परीक्षा केंद्रांना भेटी देण्याचे निर्देश दिले आहेत.

इयत्ता 10 वी व 12 वीच्या सर्व परीक्षा कॉपीमुक्त व शिस्तबद्ध वातावरणात पार पडत असून विद्यार्थ्यां व पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## शिवजयंतीच्या दिवशी आनंदवाडी मध्ये 100.चा ट्रान्सफार्मर मंजूर,


### अमरसिंह पंडित ,विजयसिंह पंडित, मोहन देवकते यांच्या पाठपुराव्याला यश,

बीड प्रतिनिधी
बीड पासून जवळ असलेल्या आनंदवाडी गावामध्ये गेल्या अनेक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित होता गेल्या अनेक दिवसापासून या गावचे विद्यमान सरपंच मोहन देवकते हे सातत्याने पाठपुरावा करत होते ,शिवजयंतीच्या दिवशीच 100 चा ट्रान्सफार्मर मंजूर होऊन उद्घाटन होणं म्हणजे गावासाठी खरंच मोठी भेटच झाली , आनंदवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त डीपीडीसी मधून 100 KVA चा ट्रान्सफार्मर मंजूर करण्यात आला.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे



प्रदेश सरचिटणीस मा.आ.अमरसिंह पंडित साहेब व गेवराई तालुक्याचे लोकप्रिय आमदार मा. विजयसिंह राजे पंडित साहेब तसेच या आनंदवाडी गावचे विद्यमान सरपंच मोहन नाना देवकते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा ट्रान्सफार्मर मंजूर झाला. याचे उद्घाटन युवा नेते पृथ्वीराज पंडित यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच आनंदवाडी ग्रामस्थांच्या वतीने मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी या कार्यक्रमाला संतोष खरसाडे, सुनील खताळ ,बालाजी पवार आधी गावातील ग्रामस्थ युवक ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## लग्नमंडपात मंगलाष्टकं सुरू होण्यापूर्वीच ऐकू आल्या किंकाळ्या



एका बाजूला लग्नाची लगबग, अवघ्या काही तासांत घुमणारे मंगल अष्टकांचे सूर आणि आनंदाचे वातावरण... पण काही क्षणांतच या आनंदाचे रूपांतर किंकाळ्या आणि रक्ताच्या थारोळ्यात झाले. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील पिंपळनेर जवळील घोडेमाळ येथे एका लग्नकार्यापूर्वी झालेल्या वादातून ३ जणांची चाकूने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली. गुजरातच्या सोनगड येथून आलेल्या वऱ्हाड्यांनीच हा थरार घडवून आणला. यावेळी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून ३ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. नेमकं काय घडलं?
मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळनेर शिवारातील विजू गोसावी यांच्या मुलीचा विवाह गुरुवार १९ फेब्रुवारीला संपन्न होणार होता. बुधवारी १८ फेब्रुवारीला दुपारी साखरपुडा आणि हळदीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला सुरुवातही झाली. पण अचानक गोसावी समाजातील दोन गटांत जुन्या कौटुंबिक वादाची ठिणगी पडली. या प्रत्यक्षात वादाचे मूळ कारण मोबाईलवर ठेवलेले स्टेटस असल्याचे समोर आले आहे. या स्टेटसवरून सोनगड गुजरात येथून आलेल्या वऱ्हाडी मंडळींनी वधू पक्षातील व्यक्तींना जाब विचारला. यानंतर शाब्दिक चकमक झाली. यानंतर हळूहळू याचे रूपांतर पाहता पाहता हाणामारीत झाले. यावेळी संतापलेल्या आरोपींनी सोबत आणलेल्या धारदार चाकूने समोर दिसतील, त्यांच्यावर सपासप वार करण्यास सुरुवात केली. यामुळे अनेकजण जखमी झाले.

## किनवट नगर परिषदेच्या स्थायी समितीची बैठक संपन्न

### निधीचा योग्य विनियोग करून दर्जेदार कामाला आमचे प्राधान्य: नगराध्यक्षा सौ. सुजाता एंड्रलवार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
किनवट : येथील नगर परिषदेच्या स्थायी समितीची पहिली महत्त्वपूर्ण बैठक आज नगराध्यक्षा सौ सुजाता विनोद एंड्रलवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली असुन या बैठकीत मागील वर्षातील सुधारित शिल्लक 3201811 रु व चालू वर्षाचे अनुमानीत 5278496 रु चे अंदाजपत्रक शिफारशी करिता ठेवण्यात आले.यावेळी शहराच्या प्रलंबित व संभाव्य विकासकामासंदर्भातही सविस्तर चर्चा करण्यात आली.

निवडणूक काळात किनवटवासीयांना दिलेल्या वचनाची पूर्तता करण्यासाठी नगराध्यक्ष सुजाता विनोद एंड्रलवार तत्परतेने




कामाला लागल्या असून आज किनवट नगर परिषदेच्या स्थायी समितीची पहिली वहिली बैठक नगरपालिकेच्या सभागृहात संपन्न झाली. या सभेत सन 2025 -26 या वर्षातील सुधारित शिल्लक 3201811 रु व सन 2026-27 या वर्षातील अंदाजीत शिल्लक 5278496 रु असे एकूण 8480307 रु चे अंदाजपत्रक चर्चेसाठी सभेपुढे ठेवण्यात आले.

या बैठकीत पाणीपुरवठा,स्वच्छता, दिवाबत्ती, करवसुली, घनकचरा नियोजन, अतिक्रमण तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यावर एक मताने निर्णय घेण्यात आला. उन्हाळ्याची चाहूल पाहता शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत होऊ नये, यासाठी जलवाहिन्यांची दुरुस्ती आणि टँकरची उपलब्धता यावर चर्चा झाली.
बंद असलेले पथदिवे तात्काळ दुरुस्त करण्याचे काम तात्काळ हाती घेण्याचे ठरले.
“शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे मुख्य ध्येय असून, निधीचा योग्य विनियोग करून दर्जेदार कामे करण्याला आमचे प्राधान्य राहील,” असे मत यावेळी नगराध्यक्षा सौ सुजाता विनोद एंड्रलवार यांनी व्यक्त केले

या बैठकीला उपनगराध्यक्ष तथा नियोजन व विकास समिती सभापती पठाण महोम्मद हसन म. नूरखान, बांधकाम सभापती श्रीराम नेम्मानीवार, पाणीपुरवठा सभापती निलोफर निसार भाटी, स्वच्छता सभापती सौ अश्विनी आदर्श जागरलावार, महिला व बालकल्याण सभापती प्रीती धीरज नेम्मानीवार, क्रीडा व सांस्कृतिक सभापती नूरसबा शेख मुकद्दर, मुख्याधिकारी मुगाजी काकडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, करनिर्धारक मिलिंद घुले, लेखापाल चक्रपाणि कदम, लेखापरीक्षक विष्णू पुजारी यांच्यासह नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

संपादकीय

## अनुभवी 'तरूणांचे' नंदनवन "



प्रशांत बाफना 8055440385
. युवादिन व महापालिका निवडणूकीच्या धामधूमीचे औचित्यसाधून भाष्य करणाऱ्या या विचारप्रवर्तक लेख

आजमितीस तरूणांचा देश म्हणून ओळख असलेल्या भारतात सुमारे १५ कोटी ज्येष्ठ नागरिक राहतात.
भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाने नुकतीच निवृत्तीवेतन धारकांची यादी प्रसिद्ध केली आहे.त्यातील शहरांचा क्रम पाहता सेवानिवृत्तांचे नंदनवन
"पेन्शनर्र पॅराडाइज" म्हटले जाणारे पुणे चक्क मागे पडले आहे आणि पहिले-दुसरे स्थान अनुक्रमे कोल्हापूर व नाशिकने पटकावले आहे. चौथा क्रमांक नागपूरने पटकावला आहे.तंत्र-मंत्र आणि यंत्रभूमी नाशिकमध्ये जवळपास दोन लाख सरकारी निवृत्तीवेतन धारक आहेत.काही दिवसांपूर्वी झालेल्या एका खासगी सर्वेक्षणातही नाशिक परीसरात वृद्धांची संख्या झपाट्याने वाढल्याचे आढळले आहे.मुबलक हवापाण्याची ख्याती सर्वदूर पोचल्याने आयुष्याची सायंकाळ आल्हाददायी वातावरणात घालवता यावी यासाठी अनेक जण महानगरच्या तुलनेत नाशिक- कोल्हापूरसारख्या 'स्वस्त' आणि 'मस्त' शहरांना पसंती देत असावेत.

नाशिकमधील चलार्थपत्र मुद्रणालय, एचएएल कारखाना, देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड आदी सरकारी आस्थापना आहेत. तेथील बहुतांश कर्मचारी निवृत्तीनंतर नाशिक शहराचीच निवड करतात. संपर्कसाधने बरी असल्याने मित्रपरिवाराच्या भेटीगाठी शक्य होतात. महानगराच्या तुलनेत दैनंदिन गरजा कमी पैशात भागतात. 'पेन्शन 'मध्ये भागून जाते.नाशिकची सिस्टर सिटी 'म्हटल्या जाणाऱ्या कोल्हापूरलाही हा ठोकताळा लागू पडावा. खरोखरच वृद्धांची संख्या वाढली तर 'वयोवृद्धांचे शहर ' ही नवी ओळख शहराला रूचेल काय?खासकरून रोजगाराला आसुसलेल्या युवाशक्तीचा हिरमोडतर होणार नाही ना ?असे काही नवे प्रश्नही निर्माण होतात. शहरातील वृद्ध वाढले असतील,तर ते शहरही 'म्हातारे'म्हणून हिणवले जाऊ शकते.ते धावू शकणार नाही,असाही अर्थ काढता येतो.मग कशाला हवेत आणखी प्रकल्प आणि विकास, असा सवालही केला जाऊ शकतो. छोट्या शहरांबाबत याची प्रचिती अधून- मधून येत असते.

अलिकडे नाशिक परिसरात बरेच वृद्धाश्रम उघडले आहेत. शहराच्या हद्दीबाहेर त्यांची संख्या झपाट्याने वाढते आहे.उच्चभ्रू वसाहतींत दरघरटी मुले परदेशात जात असल्याने एकाकी आयुष्य जगणाऱ्यांची दिवदेनदिवस भर पडते आहे.आज भारत तरूणांचा देश असला तरी २०५० पर्यत तो म्हाताऱ्या लोकांचा होऊ शकतो. तेव्हा वयोवृद्धांची संख्या ३५ ते ४० कोटी असेल,असे सांगितले जाते. भारत म्हाताऱ्यांचा देश होऊ शकतो असे सांगितले जाते.इतक्या संख्येने जेष्ठ असतील तर त्यांच्यासाठीच्या सुविधा,त्यांचा 'हॅपीनेस इंडेक्स 'आदीची काळजी वाहायला हवी ना!दुर्दैवाने अद्यापही आपली व्यवस्था गंभीर नाहीच.नाशिकमध्ये हवापाणी मुबलक असले तरी विरंगुळ्याची बोंबाबोंब आहे.सरकारी आस्थापनात लिफ्ट, पाण्यापासून मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव दिसतो.ज्येष्ठांच्या फार अपेक्षा नाहीत;पण त्यांना सन्मानाची वागणूक हवी. त्यांच्याप्रति कृतज्ञतेचे भान जपले जावे एवढेच त्यांचे म्हणणे आहे.सध्या महापालिका निवडणूकीची धामधूम आहे.किमान नवे कारभारी तरी ही समस्या समजून घेतील, ही अपेक्षा.मात्र दुर्दैवाने चुनावी मुद्द्यांभोवतीच निवडणूका गाजत आहेत.सारे जण विकासाच्या नावाने गळे काढत आहेत.शहरांमध्ये येऊ घातलेल्या या अनुभवी 'तरूणांचा' शहरांची जडणघडण अन् विकासासाठी खुबीने वापर व्हावा, इतकीच आजच्या युवादिनी अपेक्षा

# बहुजन कल्याण विभागाकडून 50 हजार रुपये इतके अतिरिक्त अनुदान

बीड (प्रतिनिधी):-
दिनांक 22 2 2026 बहुजन कल्याण विभागाकडून 50 हजार रुपये इतके अतिरिक्त अनुदान विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आणि इतर समाजातील लाभार्थ्यांना इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून 50 हजार रुपये इतके अतिरिक्त अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी रुपये 60 कोटी इतका निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे सदर निधी वितरित करण्यासाठी संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांना नियंत्रण अधिकारी आणि उपसंचालक राज्य, व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण सिडको भवन सीबीडी बेलापूर नवी मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे वित्तीय नियमावली व महाराष्ट्र अर्थ नियमावली पुस्तिका नुसार वित्त विभागाने निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार सदर निधी खर्च करताना कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दखल घेण्याची तसेच सदर निधी खर्च केल्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र वेळोवेळी महालेखापाल शासन व संबंधितांना सादर करावयाची जबाबदारी संचालक राज्य



व्यवस्थापन कक्ष ग्रामीण, गृहनिर्माण सिडको भवन सीबीडी बेलापूर नवी मुंबई, यांची राहील याबाबतचा खर्च सन 2025 -26 या वित्तीय वर्षात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, व अल्पसंख्यांक यांचे कल्याण 03 मागासवर्गीयांचे कल्याण 102- आर्थिक विकास (01) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, व विशेष मागास प्रवर्ग, यांचे कल्याण प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण टप्पा 2 (अतिरिक्त राज्य हिस्सा) ( 2225 जी 653) आर्थिक तरतुदीतून मागविण्यात येणार आहे.

# रमजानच्या पवित्र महिन्यात शेख अमान आणी अर्फियाचा पहिला रोजा.

धर्माबाद प्रतिनिधी पवित्र रमजान महिन्याची सुरुवात मोठ्या भक्तीभावाने झाली असून धर्माबाद शहरातील चिमुकल्या शेख अमान शेख अहेमद खाजा मिया वय 9 वर्ष आणि अर्फिया बेगम शेख अर्शद खाजा मिया वय 7 वर्ष रा बाळापूर, धर्माबाद ह्यांनी आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला.एवढया लहान वयात रोजा ठेवून अमान आणि अर्फिया



ह्यांनी सर्वांचे कौतुक मिळवले आहे. रमजान महिना मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र मानला जातो. या महिन्यात पहाटेपासून सुर्यास्त पर्यंत उपवास (रोजा) ठेवला जातो. नमाज पठण,कुरआन वाचन, दानधर्म आणि गरजूची मदत याला विशेष महतव असते.सयम , शिस्त, आणि आत्मशुधदीचा संदेश या माध्यमातून दिला जातो. दोघे भाऊ बहिणीने उत्साहाने आणि श्रद्धेने पहिला रोजा ठेवत कुटुंबीयासोबत नमाज अदा केली . त्यांच्या या धार्मिक भावनेचे आणि चिकाटीचे परिसरात विशेष कौतुक होत आहे.लहान वयातच चांगले संस्कार जपणारी शेख अमान आणि अर्फिया हे इतर मुलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. रमजान महिन्याच्या निमित्ताने सर्वत्र शांतता, बंधुता आणि सद्भावनेचा संदेश दिला जात आहे.

# कर्तव्यापलिकडच्या निसर्गदूताने दिला मानवतेचा संदेश कार्यालयाच्या आवारात

## तहसीलदाराने स्वखर्चाने केली वृक्षलावगड; झाडे जगवण्यासाठी घेतला पुढाकार

शिरुरकासार/ पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वनक्षेत्रात वाढ हाच एकमेव पर्याय आहे. त्यामुळे वृक्षलागवड मोहिमेला व्यापक चळवळीचे स्वरुप प्राप्त होणं महत्वाचं आहे. वृक्षलागडीचे फलित होण्यासाठी वृक्ष संरक्षण, संवर्धनाच्या उपाय योजनां चळवळीमध्ये रुपांतरीत होणं गरजेचं आहे असाच संदेश देत बीडच्या शिरुर कासारचे तहसीलदार सुरेश घोळवे यांच्यातील निसर्गदुताने दिला आहे.
नैसर्गीक साधनसंपत्तीचे जतन, हाच पर्यावरणीय बदलांवर उपाय हे सुर्य प्रकाशाइतके सत्य आहे. वातावरणातील नैसर्गीक बदलांमुळे माणुस खडबडून जागा होताना दिसून येत आहे. सामाजिक, शासनस्तरावरुन वृक्षलागवडचा प्रचार, प्रसारासह व्यापक जागृतीमुळे अगदी बालमनावर वृक्षमहत्व बिंबत आहे. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत असले तरी संरक्षण संवर्धणासह वृक्षजगवण्यासाठी उपाय योजनांची क्रांतीच माणवतेला तारु शकते. यासाठी लाखो हातांसोबत निसर्गप्रेमाच्या माणसीकतेची गरज असल्याचा संदेश शिरुर कासार तालुक्याचे तहसीलदार



सुरेश घोळवे यांनी दिला आहे.
कर्तव्याच्या पलिकडे निसर्गाशी माणवतेच्या अतुट नात्याची जानिव करुन देण्यासाठी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी आपल्यातील निसर्गदूत जागृत केला आहे. शिरुर कासारच्या झापेवाडी शिवारातील सर्वे नंबर 51 मधील ओसाड माळरानावर खडकाळ जमिनीत आधिच्या वृक्षांना सवंगड्याची साथ मिळावी यासाठी स्वर्चाने जांभूळ,पाम, कन्हेर, रबर, नारळ, वड, पिंपळ, चाफा प्रजातीचे शेकडो दिर्घआयुष्यी स्वजाती वृक्षरोपे खरेदी केले. बीड येथील खासगी नर्सरितून वृक्षरोपे खरेदी करून आठवड्यातील वारांचे वृक्षांना नामकरण करत शास्त्रीय पद्धतीने तहसील कार्यालयाच्या आवारत वृक्षारोपन केले.
जबाबदारीतून कर्तव्य बजावताना कार्यालय आवारातील वृक्षांची कायम प्रेरणा मिळत राहावी या उद्देशाने वृक्षजगवण्यासाठी संरक्षण, संवर्धनाच्या उपाय योजनांसह पाण्याची जबाबदारीही त्यांनी कार्यालयातील वृक्षप्रेमींवर सोपवली. तहसीलदार सुरेश घोळवे यांचा हा अभिनव उपक्रम प्रेरणास्थानी आहे. प्रशासन सेवेतील प्रत्येक जबाबदार हातांनी या मोहिमेला व्यापक बळ देण्याची गरज आहे. शुक्रवारी जांभुळ वृक्षलागवड करताना तहसीलदार सुरेश घोळवे, नायब तहसीलदार गणेश दहिफळे, महसूल कर्मचारी अतुल कातखडे, बाबासाहेब बर्डे, प्रशांत आगलावे, अविनाश काकडे, नितीन जाधव यांच्यासह निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला, तहसीलदार घोळवे यांच्या उपक्रमांचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

# इंस्टाग्रामवर जुळले प्रेमसंबंध .... अल्पवयीन प्रेमी युगल अहिल्यानगर पोलिसांच्या ताब्यात

## पळुन जावुन आत्महत्येचा निश्चय केलेले अल्पवयीन प्रेमीयुगुल स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांचेकडुन ताब्यात.

अहिल्यानगर/ -प्रस्तुत बातमीची हकीगत अशी की, तोफखाना पोलीस ठाणे गु.र.नं. 90/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यामध्ये फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय 16 वर्षे ही अहिल्यानगर येथे एका कॉलेजमध्ये इयत्ता 12 वी चे वर्गामध्ये शिक्षण घेवुन अहिल्यानगर या ठिकाणी मैत्रीणींसोबत राहण्यास होती. सदर अल्पवयीन मुलगी ही रात्रीचे वेळी जेवण करुन फेरफटका मारण्यासाठी रुमचे बाहेर गेली असता तिस अज्ञात आरोपीने कशाचे तरी अमिष दाखवुन पळुन नेलेले आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री किरणकुमार कबाडी यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार दिपक घाटकर, बाळासाहेब नागरगोजे, भिमराज खर्से, प्रशांत राठोड, किशोर शिरसाठ, बाळासाहेब खेडकर, महिला



पोलीस अंमलदार ज्योती शिंदे, सोनल भागवत यांचे पथक तयार करुन अपहरण झालेल्या मुलीचा शोध घेणेबाबत पथकास सुचना व मार्गदर्शन करुन सदरचे पथक रवाना करण्यात आले होते.
वरील पथकाने अपहरित मुलीचे नातेवाईक, मैत्रीणी यांचेकडे विचारपुस केली तसेच दिनांक 19/02/2026 रोजी अपहरित अल्पवयीन मुलीची व आरोपीची व्यवसायीक कौशल्याचे आधारे माहिती काढत असतांना पथकास गुन्ह्यातील पिडीत मुलगी ही जालना जिल्ह्यातील अल्पवयीन मुलाने पळवुन नेली असल्याचे व अपहरित मुलीसह सदरचा मुलगा हा नेवासा येथील बस स्टँड परिसरामध्ये थांबलेला असल्याची माहिती प्राप्त झाली. पथकाने तात्काळ नेवासा या ठिकाणी जावुन खात्री करता बस स्टँड परिसरामध्ये एक मुलगा एक मुलगी संशयीतरित्या थांबलेले असल्याचे दिसुन आले. सदर मुलगा व मुलगी यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विश्वासाने विचारपुस करता त्यांनी त्यांचेमध्ये इंस्टाग्राम या सोशल मिडीया ऍप मधुन ओळख होवुन प्रेमसंबंध तयार झालेले असुन ते वैयक्तिक कारणास्तव पळुन जावुन आत्महत्या करणार असलेबाबत कळविले.
पथकाने ताब्यातील अल्पवयीन अपहरित मुलगी व विधीसंघर्षीत बालक यांचे मन परिवर्तन करुन त्यांना पुढील तपासकामी तोफखाना पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असुन पुढील तपास तोफखाना पोलीस ठाणे हे करीत आहेत.
अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातर्फे पालकांना त्यांचे मुला – मुलींचे मोबाईलमधील सोशल मिडीया ऍपवर लक्ष ठेवुन असे प्रकार होणार नाही याची दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.
सदरची कारवाई मा. श्री. सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

## धारूर येथील श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये शिवजयंती उत्साहात साजरी




किल्ले धारूर /अविनाश जगताप श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल किल्ले धारूर येथे शिवजयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून किल्ले धारूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री बाळासाहेब जाधव यांनी उपस्थिती दर्शवली तर प्रमुख उपस्थिती म्हणून किल्ले धारूर परिषदेचे नगरसेवक श्री सुधीर शिनगारे सर, नगरसेवक कृष्णा भावठाणकर सर, गटनेते नितीन शिनगारे सर, नगरसेवक गणेश सावंत सर, नगरसेवक सचिन जाधव सर, नगरसेवक प्रदीप नेहरकर सर, नगरसेवक प्रवीण गायके सर, धारूर तहसीलचे तांत्रिक सहाय्यक मिथुन गायसमुद्रे सर, श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलचे संचालक बाळासाहेब राठोड सर, संचलिका राठोड मॅडम, यांच्यासह धारूर शहरातील व्यापारी, पत्रकार बांधव व बहुसंख्य पालक वर्ग उपस्थित होते.

सर्वप्रथम उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते रयतेचा राजा शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार सन्मान करण्यात आला.

यावेळी धारूर नगर परिषदेचे नगरसेवक,श्री सुधीर शिनगारे सर, व कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा धारूर नगरपरिषद चे नगराध्यक्ष श्री बाळासाहेब जाधव सर यांनी उपस्थित विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन केले. यावेळी सुधीर शिनगारे यांनी शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाबद्दल व सद्यस्थितीत चालत असलेल्या रूढी परंपरा बद्दल विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले व महाराजांचा इतिहास फक्त ओठातच नाही तर तो डोक्यात ठेवण्याचे सांगितले.

यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्य वर आधारित पोवाडा, शिवजन्मोत्सव पाळणा, विविध प्रकारची गाणे, व वेगवेगळे लेझीम पथक, सादर केले. यावेळी सर्व उपस्थित असणारे अतिथी व पालक कार्यक्रम पाहण्यामध्ये मंत्रमुग्ध झाले होते.

यावेळी शाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोशाख परिधान केला तर काही काही विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ यांचा पोशाख परिधान केला.
सदरील कार्यक्रमाचे संचलन सौ. कोमल ठोंबरे मॅडम व श्री कांदे सर यांनी केले. तर उपस्थित सर्व मान्यवरांचे व पालक वर्ग यांचे आभार शाळेच्या तंत्रसहायिका सौ. राऊत मॅडम यांनी केले, व कार्यक्रम संपन्न झाला.

दैनिक लोकआरंभ
शनिवार २१ फेब्रुवारी २०२६
www.lokaarambh.com



# भगवान बालाजी द्वितपुर्ती महोत्सव प्रारंभ !

## सात दिवस कीर्तन प्रवचन व सामुहिक ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण!




शिरूर कासार/ : येथील भगवान बालाजी मुर्ती प्राणप्रतिष्ठेला चोवीस वर्ष पुर्ण होत असल्याने या द्वितपपुर्ती महोत्सवात सात दिवस ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण,कीर्तन व प्रवचन असे कार्यक्रम सुरू आहेत .सिध्देश्वर संस्थानचे महंत तथा कांदिवली आनंदवन आश्रमाचे स्वामी विवेकानंद गिरीजी महाराज यांचे मार्गदर्शनाखाली व उत्तराधिकारी विवेक महाराज शास्त्री यांचे उपस्थितीत बुधवारी हा महोत्सव सुरू झाला असुन सकाळी ज्ञानेश्वरी पारायणाचे व्यासपिठ चालक म्हणून विजयकुमार गाडेकर हे भुमिका निभावतात ,दुपारी चार ते पांच यावेळेत प्रवचन अंबादास बडे ,शालिनीताई देशपांडे ,चंद्रकांत थोरात , डॉ प्रशांत सुळे ,ब्रम्हदेव जाधव नवनाथ बडे आणि विजयकुमार गाडेकर यांची प्रवचन सेवा तर सायंकाळी गुलाब महाराज ,कैलास महाराज ,हनुमंत महाराज ,राजश्रीताई जाधव ,राजेद्र महाराज चोरडीया ,कृष्णा महाराज व सौरभ महाराज यांचे कीर्तन आहेत .

बुधवारी समारोप असुन काल्याचे कीर्तन सिध्देश्वर संस्थानचे उत्तराधिकारी विवेक महाराज शास्त्री यांचे सकाळी दहा ते बारा या वेळेत होणार असुन सतिष कपाळे ,विष्णूपंत बेदरे व मंच्छिद्र काटे यांचा महाप्रहाद होणार आहे .

ज्ञानेश्वरी वाचकास जेष्ट नागरीक तथा माजी सरपंच कांतिलाजी देसरडा ,संजयकुमार व संतोषकुमार देसरडा यांचेकडून भेटवस्तू प्रसाद म्हणून दिली जाणार आहे .

भगवान बालाजी महोत्सवास मोठ्या संखेने उपस्थित राहण्याचे आवाहन उत्सव समितीकडून करण्यात आले आहे .

प्रवचन व कीर्तनसेवा विनामुल्य ! बहुधा प्रवचन कीर्तन म्हटले की मोठी दक्षणा द्यावी लागते मात्र बालाजी महोत्सवात प्रवचन व कीर्तन सेवा ही विनामुल्य देण्यात येत असल्याचे आयोजकाकडून सांगितले जाते ,विनादक्षणा सेवा या उपक्रमाचे सर्वाकडून स्वागत होत आहे

# जालन्यातील तीर्थ रेसिडेन्सी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी..

## मुलांसाठी भाषण व रांगोळी स्पर्धा; शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व आरती..



सोयगाव ता...
| प्रतिनिधी.. सुनील चोरमले..
जालना येथील तीर्थ रेसिडेन्सी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सालाबादाप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून मनोभावे आरती करण्यात आली.

यावेळी लहान मुलांसाठी भाषण स्पर्धा तसेच रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविणाऱ्या मुलांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाला दिनकरराव बापू, गणेशराव नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रा. रामदास जारे, भागवत भोसले, श्री. श्याम भुतेकर, भारत गडदे सर, अनिल चौरे पाटील, श्री. समाधान मानटे, यशवंत खंदारे पाटील, विलास घुले, सुभाष घुले, राजेश पवार सर, कुमार हर्षद भोसले, कुमार यशराज घुले, गायक भागवत कदम पाटील, बुवा भुंबर आदींसह अनेक शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रकाश वाघमोडे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन किशोर शिंदे पाटील यांनी मानले. उत्साही वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# मराठीच्या सशक्तीकरणासाठी एकताचे योगदान महत्त्वपूर्ण - भास्कर निर्मळ

## [सरोज देशपांडेंच्या हस्ते संमेलनाचे उद्‌घाटन]

अहिल्यानगर ( ) : वाचक व लेखक साहित्य संस्कृतीचा मूलाधार आहेत. वाचकपीठ आणि एकता फाउंडेशन सारख्या चळवळींनी मराठी भाषा सशक्त करण्यासाठी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले असून या व्यासपीठावरून मान्यवरांसह अनेक नवकवी, नवलेखकांनाही आवर्जून संधी दिली जाते याचा अभिमान वाटतो असे प्रतिपादन निवृत्त उपविभागीय विद्युत अभियंता तथा संवेदनशील कवी भास्कर निर्मळ (लोणी, अहिल्यानगर) यांनी केले. शिवजयंतीनिमित्त एकता फाउंडेशन आयोजित 43 व्या राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन म.सा.प.संभाजीनगर च्या संचालिका तथा जेष्ठ कथाकार सरोज देशपांडे (परभणी) यांनी केले.

एकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी संचालक जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, ग्रामीण कथाकार प्रा.डॉ.भास्कर बडे, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, उपाध्यक्ष नितीन कैतके, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, परभणी महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभाताई घुंगरे, परभणी जिल्हा उपाध्यक्षा मेघा नांदखेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या राज्यस्तरीय एकता काव्य संमेलनाची सुरवात झाली. यावेळी सरोज देशपांडे यांनी 'सावित्रीमाई', 'पाऊस' या रचना सादर करून रसिकांना खिळवून ठेवले. 'तो लिहीतच असतो एक कविता', 'कवितांचे व्हावे अजिंठा वेरूळ' या चिंतनशील रचना पेश करत भास्कर निर्मळ यांनी उपस्थितांची मने जिंकली. बारामती जि.पुणे येथील कवयित्री डॉ.स्वाती आनंद वनवे यांनी 'असं कुठं आहे', 'मी जन्मून पुन्हा येईन' या भावगर्भ कविता पेश करत उपस्थितांची वाहवा मिळवली. तद्नंतर अंजली रहाणे (नाशिक) यांच्या 'लेखणी' रचनेला उत्तम दाद मिळाली



तर नेवासा जि.अहिल्यानगर येथील युवाकवी प्रविण गवळी याने 'सई' विषयावरील दोन प्रेमकविता उपस्थितांसमोर सादर केल्या. युवाकवी गिरीश खोब्रागडे (नेर जि.यवतमाळ) याच्यासह युवा गझलकार कुणाल शिरूडे (मालेगाव जि.नाशिक) यांच्या एक से बढकर एक गझलांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. आटपाडी जि.सांगली चा युवाकवी अण्णासाहेब मेटकरी याची 'शिवराय' ही समायोचित रचना उत्तम होती. अनघा कुलकर्णी (शिरूर का.जि.बीड) हिच्या 'नमस्कार राजे', 'आई' या कवितांनाही भरघोस प्रतिसाद मिळाला. राहुरी तालुक्यातील टाकळीमियाँ गावचे राजू उदमले यांनी काव्य संमेलनात ऐनवेळी सहभाग घेत 'कोयता' हे काव्य सादर केले. या संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन करणारे बीड येथील युवालेखक डॉ.कृष्णा नागरे याने 'अबोल' ही रचना पेश करत रसिकांच्या टाळ्या मिळवल्या. एकताचे पाटोदा तालुका सहसचिव कवी बाळासाहेब नागरगोजे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर एकता फाउंडेशन विद्यार्थी आघाडी शिरूर तालुकाध्यक्ष कवी कार्तिक कांबळे याने आभार प्रदर्शन केले.

यावेळी ज्येष्ठ कवी संदिपान पवार (पुणे), आनंद शिंदे (देहरादून), मारूती सावंत, अनिल केसेकर, खेळबा काळे (माजलगाव), संतोष शिंदे, प्रशांत गवई, संजय धांडे, भाऊसाहेब पवार, गोरख जायभाये, मंगेश थेटे, औदुंबर कटारे, गणेश वसावे यांसह महाराष्ट्रभरातील रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती

# राजेश गायकवाड यांना एम.सी.जे पदवी प्रदान..

किनवट प्रतिनिधी / विलास भालेराव
पत्रकारिता क्षेत्रातील महत्त्वपूर्ण मानला जाणारा बीए एम सी जे ( मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम) या परीक्षेत गायकवाड यांनी प्रथम श्रेणित यश संपादन प्राप्त केल्यामुळे गायकवाड यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे पदवी प्रदान करण्यात आले

किनवट तालुक्यातील हुडी येथिल रहिवासी असलेले राजेश किशन गायकवाड यांनी नांदेड येथे असलेल्या श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयात ३ वर्ष पत्रकारिता क्षेत्रातील महत्वपुर्ण मनाला जाणारा (बी.ए,एम.सी.जे ) मास कम्युनीकेशन & जर्नालिसम या व्यवसायभूमीक परीक्षेचा परिपूर्ण अध्ययन करून प्रथम श्रेणित यश संपादन केले आहे.

त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे राजेश गायकवाड यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते एमसी जे पदवी प्रदान करण्यात आले.

हा भव्यदिव्य पदवी वितरण सोहळा वार - शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २६ रोजी नांदेड श्री गुरुगोविंद सिंग जी पत्रकारिता महाविद्यालय मालेगाव रोड, नांदेड येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष- प्रा. विकास कदम, तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशार सिंग साबळे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. शेखर घुंगरवार, डॉ.



देवदत्त देशपांडे, विकास कदम,आदिजन विचार पिठावर उपस्थित होते. गायकवाड यांना MCJ पदवी प्रदान करण्यात आल्यामुळे पत्रकार- गौतम कांबळे परमेश्वर पेशवे मारुती शेळके ईश्वर जाधव नारायण दंतलवाड काशिनाथ शिंदे गणेश जयस्वाल गंगाराम गड्डमवार प्रमोद जाधव गजानन वानोळे किरण वानखेडे विशाल भालेराव विलास भालेराव एमजलवाड इम्रान घोडके रावसाहेब कदम यांनी अभिनंदन केले आहे.

# शिवरायांच्या स्वप्नातील सुराज्य घडविण्याची जबाबदारी लेखकांनी घ्यावी - सरोज देशपांडे

## [संमेलनाध्यक्षपदी जेष्ठ लेखक भास्कर निर्मळ]

अहिल्यानगर ( ) : छत्रपती शिवाजीमहाराजांनी रयतेसाठी स्वराज्य स्थापन करून त्याची उत्तम प्रकारे घडी बसवली व सदैव जनहिताकडेच लक्ष दिले. नंतरच्या काळात महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचे शिक्षणविषयक योगदान अतुलनीय आहे असे प्रतिपादन म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणीतील संचालिका तथा जेष्ठ कथाकार मा.सरोज देशपांडे यांनी केले. शिवजयंतीनिमित्त एकता फाउंडेशन द्वारा आयोजित 43 व्या राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनाच्या उद्‌घाटक पदावरून त्या बोलत होत्या. या संमेलनाच्या अध्यक्षपदी निवृत्त उपविभागीय विद्युत अभियंता तथा संवेदनशील कवी भास्कर निर्मळ (लोणी, अहिल्यानगर) हे होते. एकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणीतील संचालक जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, ग्रामीण कथाकार प्रा.डॉ.भास्कर बडे, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, उपाध्यक्ष नितीन कैतके, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, परभणी महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभाताई



घुंगरे, परभणी जिल्हा उपाध्यक्षा मेघा नांदखेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या राज्यस्तरीय एकता काव्य संमेलनाची सुरवात झाली. यावेळी 'तो लिहीतच असतो एक कविता', 'कवितांचे व्हावे अजिंठा वेरूळ' या चिंतनशील रचना पेश करत भास्कर निर्मळ यांनी उपस्थितांची मने जिंकली. सरोज देशपांडे (परभणी) यांनी 'सावित्रीमाई', 'पाऊस' या रचना सादर करून रसिकांना खिळवून ठेवले. बारामती जि.पुणे येथील कवयित्री डॉ. स्वाती आनंद वनवे यांनी 'असं कुठं आहे', 'मी जन्मून पुन्हा येईन' या भावगर्भ कविता पेश करत उपस्थितांची वाहवा मिळवली. तद्नंतर अंजली रहाणे (नाशिक) यांच्या 'लेखणी' रचनेला उत्तम दाद मिळाली तर नेवासा जि. अहिल्यानगर येथील युवाकवी प्रविण गवळी याने 'सई' विषयावरील दोन प्रेमकविता उपस्थितांसमोर सादर केल्या. युवाकवी गिरीश खोब्रागडे (नेर जि.यवतमाळ) याच्यासह युवा गझलकार कुणाल शिरूडे (मालेगाव जि.नाशिक) यांच्या एक से बढकर एक गझलांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. आटपाडी जि.सांगली चा युवाकवी अण्णासाहेब मेटकरी याची 'शिवराय' ही उत्तम रचना समायोचित होती. अनघा कुलकर्णी (शिरूर का.जि.बीड) हिच्या 'नमस्कार राजे', 'आई' या कवितांना रसिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. टाकळीमियाँ ता.राहुरी गावचे राजू उदमले यांनी ऐनवेळी सहभाग घेत 'कोयता' हे काव्य सादर केले. 'अबोल' ही आत्मनिवेदनपर रचना पेश करत या संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन बीड येथील युवालेखक डॉ.कृष्णा नागरे याने केले. एकताचे पाटोदा तालुका सहसचिव कवी बाळासाहेब नागरगोजे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर एकता फाउंडेशन विद्यार्थी आघाडी शिरूर तालुकाध्यक्ष कवी कार्तिक कांबळे याने आभार प्रदर्शन केले.

यावेळी ज्येष्ठ कवी संदिपान पवार (पुणे), आनंद शिंदे (देहरादून), मारूती सावंत, अनिल केसेकर, खेळबा काळे (माजलगाव), संतोष शिंदे, प्रशांत गवई, संजय धांडे, भाऊसाहेब पवार, गोरख जायभाये, मंगेश थेटे, औदुंबर कटारे, गणेश वसावे यांसह महाराष्ट्रभरातील रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती

# निराधारांना आधार देणे हे केवळ राजकारण नाही — ती मानवतेची सेवा आहे. नगरपरिषद मंगल कार्यालय, भोकरदन.



आज भोकरदन येथे संजय गांधी निराधार योजनेतील इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजनेच्या पात्र लाभार्थ्यांचा मेळावा पंचायत राज समितीचे अध्यक्ष तथा आ. संतोष भाऊ दानवे यांच्या उपस्थित संपन्न झाला.

यावेळी संजय गांधी निराधार योजनेतील



विधवा माता आणि दिव्यांग बांधवांसोबत संवाद साधताना. त्यांच्या डोळ्यांतला विश्वास, अपेक्षा आणि वेदना जवळून अनुभवता आली. त्यांच्या आयुष्याचा संघर्ष केवळ कागदोपत्री आकडे नसून ती जिवंत वास्तवता आहे. म्हणूनच वेतन मंजुरीचे आदेश त्यांच्या हाती देताना आ. संतोष भाऊ दानवे यांचे मन भरून आले.



पुढील आठ दिवसांत e-KYC प्रक्रिया पूर्ण करून शासनाचा लाभ थेट त्यांच्या खात्यावर जमा व्हावा, यासाठी प्रशासनाला स्पष्ट व कठोर सूचना या वेळी आ. साहेबांनी दिल्या दिल्या.

याप्रसंगी माजी जि प सदस्य गणेशबापू फुके, डॉ. चंद्रकांत साबळे, नगरसेवक मुकेश चिने, राजुर मंडळाध्यक्ष गजानन



नागवे, भोकरदन मंडळाध्यक्ष रणवीर देशमुख, नगरसेवक दीपक मोरे, नगरसेवक सुमित थारेवाल, नगरसेवक रमेश बिरसोणे, नगरसेवक राजु सहाने, तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे, मुख्याधिकारी गजानन तायडे यांच्यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शिमग्याआधी कोकणी माणसासाठी गुड न्यूज, सरकारची मोठी घोषणा



## शिमग्यासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी फडणवीस सरकारने आनंदाची बातमी दिली

प्रतिनिधी / महाराष्ट्रासह संपूर्ण देशात होळी आणि धुळवडीचा वेगळाच उत्साह असतो. तसेच कोकणातील सर्वांसाठीही होळी आणि शिमग्याचं अनोखं महत्व आहे. या शिमगोत्सवासाठी मुंबईतून अनेक कोकणवासीय आपल्या गावी, घरी नेमाने जात असतात. त्यासाठी रेल्वे बूकिंग, गर्दी, रोडवर वाहनांच्या रांगा अशा अनेक अडचणी पार करत, मजल दरमजल करत कोकणवासीय शिमग्याल घरी येतात. मात्र आता प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी, शिमग्याआधी कोकणी माणसासाठी फडणवीस सरकारने मोठी घोषणा केली आहे. शिमग्याला आता बोटीने जाता येणार आहे, त्यामुळे कोकणवासीयांच्या आनंदात भर पडली असून त्यांना आनंदात, सर्व नातेवाईकांसह सण साजरा करता येणार आहे. येत्या 1 तारखेपासून, म्हणजेच 1 मार्चपासून समुद्रामार्गे तळकोकणात जाता येणार आहे. त्यासाठी एम टू एम फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. यासंदर्भात मंत्री नितेश राणे यांनी वेळापत्रकाची घोषणा केली आहे. त्यानुसार, 1 मार्चपासून भाऊचा धक्का ते विजयदुर्ग या फेरीस सुरूवात होणार आहे. स्वत: मंत्री नितेश राणे, हे देखील पहिल्या दिवशी बोटीने प्रवास करणार आहेत.

### रेल्वेच्या विशेष फेऱ्या

यंदाच्या उत्सवासाठी कोकणासह महाराष्ट्रातील इतर भाग आणि देशभरातील विविध राज्यांमध्ये जाणाऱ्या प्रवाशांसाठी मध्य रेल्वेने तब्बल १८६ विशेष गाड्या चालवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबई-सावंतवाडी, मुंबई-नागपूर आणि पुणे-नागपूर अशा महत्त्वाच्या मार्गांचा समावेश आहे. प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन या फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. विशेषतः मुंबई-सावंतवाडी दरम्यान धावणाऱ्या गाड्यांमुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. होळी विशेष गाड्यांच्या ९४ फेऱ्या असतील. या गाड्या केवळ होळीच्या सणांपुरत्या मर्यादित असतील. तर नियमित विशेष गाड्यांच्या ९४ फेऱ्या असतील.

# वाघी (धा) येथे शिवजयंती निमित्य रक्तदान शिबिर

## ५१ जणांनी केले रक्तदान



जिंतूर /बळीराज भराडे

जिंतूर तालुक्यातील वाघी (धा) येथे छ. शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त जय शिवराय मित्र मंडळ वाघी (धा) येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यात ५१ नागरिकांनी रक्तदान केले. ग्रामीण भागातील एवढ्या मोठ्या प्रमाणात रक्त दान करण्यासाठी नागरिकांनी उत्कृष्ट प्रयत्न केले. जिजाऊ ब्लड बँक चे संचालक शिवदत सूर्यवंशी व त्यांची टीमने सहकार्य केले.

वाघी (धा) येथील हा कार्यक्रम यशस्वी करण्या करिता अमोल बाळासाहेब गायकवाड, समाधान राजेभाऊ बोराडे, अमोल रामप्रसाद गायकवाड, बळीराम दत्तराव गायकवाड, सचिन गुलाबराव गायकवाड, मयूर लक्ष्मण गायकवाड, आकाश परमेश्वर गायकवाड आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगर हादरले अल्पवयीन मुलीचं अपहरण करुन जंगलात पाच दिवस केले अत्याचार ;तीन आरोपींना अटक

अहिल्यानगर/प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी- अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करण्यात आला. ही घटना अहिल्यानगरच्या राहुरी तालुक्यात घडली. १५ वर्षीय मुलीचं अपहरण करून तिला ५ दिवस जंगलात ठेवले आणि आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळत पीडित मुलीची सुटका केली. या घटनेमुळे अहिल्यानगर हादरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १३ फेब्रुवारी रोजी राहुरी पोलिस ठाण्यात अल्पवयीन मुलीच्या अपहरणाप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या प्रकरणी तपासाची चक्रे फिरवत आरोपींना अटक केली. ५ दिवसांनंतर नाशिक–सुरत रोडजवळ रामशेज किल्ला परिसरातील जंगलातून मुलीची सुटका करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांकडून मुख्य आरोपीसह तिघांना अटक करण्यात आली आहे.



१३ फेब्रुवारी रोजी कॉलेजला जाते असं सांगून घराबाहेर पडलेली १५ वर्षीय मुलगी घरी परत आलीच नाही. पालकांनी तात्काळ राहुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेचा गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तपास सुरू केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन ट्रॅकिंग आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची सूत्रं वेगाने हलवली. नाशिक जिल्ह्यातील जंगल परिसरातून मुलीची सुटका करण्यात पोलिसांना यश मिळालं.

या प्रकरणात मुख्य आरोपीसह तिघांविरोधात गुन्हा दाखल करत पोलिसांनी त्यांना अटक केली. पीडितेच्या जबाबानुसार पॉक्सो आणि लैंगिक अत्याचाराचे गुन्हे दाखल करण्यात आले असून अधिक तपास राहुरी पोलिस करत आहेत. या घटनेच्या निषेधार्थ संबंधित मुलीच्या गावात बंद ठेवण्यात आला होता. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत


# पाथर्डीत छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याची विटंबना ; संशयितास तीन तासांत अटक

अहिल्यानगर/
पाथर्डी शहरातील कसबापेठ परिसरात बुधवारी (दि.18) मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना केल्याची गंभीर घटना घडली. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असतानाच पाथर्डी पोलिसांनी अवघ्या तीन तासांत संशयित आरोपीला ताब्यात घेत कारवाईची चपळता दाखवली.

याबाबत श्रीहरी भास्कर बोरुडे (वय 35, रा. कसबापेठ, पाथर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत म्हटले की, रात्रीच्या सुमारास कुटुंबासह घरी असताना दगड फेकल्याचा आवाज आला. बाहेर येऊन पाहिले असता विनोद श्रीधर कोकाटे (रा. कोकाटे वस्ती, खेर्डा रोड, पाथर्डी) हा नशेत घराशेजारील पुतळ्यावर सिमेंट ब्लॉक फेकताना दिसला. आव ाज दिल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. घटनास्थळी पाहणी केली असता पुतळ्याला आघात झाल्याचे स्पष्ट दिसून आले. या प्रकारामुळे नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.परिसरातील नागरिकांनी तत्काळ एकत्र येत आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली व पोलिसांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विलास पुजारी, पोलिस उपनिरीक्षक विलास जाधव तसेच गुप्तवार्ता विभागाचे नागेश वाघ यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून आरोपीचा माग काढला. आरोपी कोकाटे हा त्याच्या घराजवळील उसाच्या शेतात लपून बसल्याचे निदर्शनास आले. मध्यरात्रीच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

दरम्यान, उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगुरू यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. संबंधित आरोपीने यापूर्वीही अशाच प्रकारे पुतळ्यावर दगडफेक केल्याची माहिती समोर येत असून इतर धार्मिक स्थळांबाबतही त्याने असे कृत्य केल्याचे बोलले जात आहे.या घटनेचा निषेध व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे

# अवैध अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या ईसमांस स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद



बीड( प्रतिनिधी ):- छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती बंदोबस्त मध्ये कर्तव्यावर असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहीती मिळाली की, एक विधीसंघर्ष बालक कंबरेला गावठी कट्टा ( बंदुक ) लावुन फिरत आहे व सध्या माने कॉम्प्लेक्स येथे थांबला आहे अशी मिळालेल्या माहीतीचे आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदरील ठिकाणी जावुन छापा मारला असता तेथे एक विधीसंघर्ष बालक यास ताब्यात घेतले असता त्याचे कडे एक गावठी बनावटीचा कट्टा मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे स्वाधीन करण्यात आले असुन विधीसंघर्ष बालकांविरुध्द पोलीस ठाणे शिवाजी नगर येथे कलम 3/25 शस्त्र अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस ठाणे शिवाजीनगर हे करीत आहेत.

सदरील कामगिरी ही श्री नवनीत कॉवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचीन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि/धनराज जारवाल, पोउपनि/श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळु सानप, आनंद मस्के, अर्जुन यादव, मनोज परजणे व चालक सिध्देश्वर मांजरे यांनी मिळुन केली आहे.



Beed | कॉपीमुक्त परीक्षा अभियानासाठी बीड जिल्हा कंट्रोल रूम मधून पाहणी करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान..शिक्षण अधिकारी प्रियाराणी पाटील

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com